बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

### माहिती कक्ष, दि ०२ मार्च २०२४

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १३८/२०२४ भादवि ३८५,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २७/०२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा चे सुमारास, वांगीकर ग्राफिक्स, गाळा नं. ३०, सिध्देश्वर पेठ, एस बी आय बँकेसमोर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०२/०३/२०२४ रोजी १४.२२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सौ. मोहसीना परवेझ काखंडकीकर, वय- ३८ वर्षे, रा. घर नं. १४७, ईराणी हॉटेलचे समोर, बेगमपेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) सैपन शेख, कुमठे, सोलापूर, २) समीर शेख नाव पत्ता माहित नाही |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी या वरील ठिकाणी दुकानात फिर्यादीचे पती हे कामानिमित्त बँकेत गेलेले असताना, वरील आरोपीत हे आले व मंद्रुपचे जागेमध्ये तुझा पती परवेझने फसवणुक केलेली आहे, ते कोणालाही सांगायचे नाही, त्याचे १० लाख रुपये तो आम्हाला देणार होता, फोन केला तर तो आमचा फोन उचलत नाही असे म्हणून शिवीगाळ केली व तु आमची पोलीसात तक्रार केली तर तुला व तुझ्या नवऱ्याला जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिलेली आहे. तसेच वरील आरोपीतांनी १० लाख रुपयेची खंडणी मागितलेली आहे ते मिळाले नाही तर तुम्हाला जिवंत सोडणार नाही अशी धमकी देवून दुकानातुन निघुन गेले म्हणून. तपास:- पोसई- शिंदे- ९६८९५९७११६ |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ८९/२०२४ भादवि ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०१/०३/२०२४ रोजी २३.३० वा ते दि. ०२/०३/२०२४ रोजी सकाळी ०९.०० वा चे दरम्यान, घोंगडे वस्ती भाजी मार्केट, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०२/०३/२०२४ रोजी १४.०३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | व्यंकटेश आनंद दासरी, वय- २८ वर्षे, रा. घोंगडेवस्ती, भाजी मार्केट सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | २०,०००/- रु एक काळया रंगाची लाल पट्टा एच एफ डिलक्स हिरो कंपनीची मोटार सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची मोटार सायकल क्रं. एम एच १३ बी एस २०५८ ही वरील ठिकाणी लावली असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या संमतीशिवाय मुद्दाम लबाडीने, हॅन्डल लॉक तोडुन चोरुन नेली आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ १६८५ आरेनवरु- ९१५६१२५१३२ |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ९०/२०२४ भादवि ३२४,३२३,५०४,५०६,५०७ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०२/०३/२०२४ रोजी दुपारी १२.३० वा चे सुमारास, मधला मारुती, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०२/०३/२०२४ रोजी १६.४३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | दिनेश काशीनाथ क्षिरसागर, वय- ४७ वर्षे, रा. शाहिर वस्ती, भवानी पेठ, सोलापूर |

| | | |
|---|---|---|
| **आरोपीचे नाव** | **:** | विजय पाटील, रा. माहित नाही |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे वरील ठिकाणी नारळ विक्री चा व्यवसाय करीत होते तेवढ्यात वरील आरोपीत हा फिर्यादी जवळ आला व त्याने शिवीगाळ करण्यास सुरुवात केली तेव्हा फिर्यादीने तुझा आणि माझा काय संबंध आहे असे विचारत असताना, आरोपीताने परत शिवीगाळ करुन हाताने व लाथाबुक्याने मारहाण करुन, फिर्यादी व्यापारासाठी बसतात ती खुर्ची उचलुन डोक्यात मारण्याचा प्रयत्न केला पण फिर्यादीने हाताने अडवली त्यावेळेस त्या खुर्चीचा मार फिर्यादीच्या नाकाला बसल्यामुळे फिर्यादीच्या नाकातुन रक्त येवू लागल्यामुळे फिर्यादीचे शेजारचे व्यापारी यांनी सोडवा सोडवी केली असता वरील आरोपीत हा तेथुन पळुन गेला. तसेच फिर्यादी हे मित्र संतोष वडीशेरला यांचे चुलत भाऊ गिरीष गादी यांच्या मोबाईलवर फोन करुन तुला खल्लास करतो अशी धमकी देवून, शिवीगाळ केली आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ- ८३६ भोगशेट्टी- ८८८८२३३९३३ |

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ८३/२०२४ भादवि ३५३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि. ०२/०३/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा ते ११.१५ वा चे दरम्यान, मुस्लीम पाच्छा पेठ, खलीप्पा यांचे अपार्टमेंट समोर बिगर नावाचे भंगार दुकानासमोर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि ०२/०३/२०२४ रोजी १४.४९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | सफौ/ जहिरोद्दीन निजामोद्दीन काझी, नेम- जेलरोड पोलीस ठाणे, सोलापूर शहर |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) महिबुब अ.करीम हुमनाबादकर, रा. मुस्लीम पाच्छा पेठ, सोलापूर, २) अज्ञात इसम |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील आरोपीत यास अदखलपात्र गुन्हयात प्रतिबंधक कारवाई करणेकरीता समक्ष बोलावले असता तो फिर्यादीस मी येत नाही, तुझे क्या करनेका कर, असे म्हणून शिवीगाळी करुन, फिर्यादीचे वर्दीची गच्छी पकडुन झोंबाझोंबी करुन, अंगावर येवून फिर्यादीस जोरात ढकलुन देवून, सरकारी कामात अडथळा निर्माण करुन, सी पी साहेबांना फोन लावुन तुझ्या विरुध्द खोटे आरोप करतो, तुला सोडणार नाही, अशी उलट सुलट भाषा वापरुन दमदाटी केली. तसेच सदर वेळी एक अज्ञात लाल टिशर्ट घातलेला इसम हा सदर तक्रार सोडवणे ऐवजी फिर्यादीचे अंगावर येवून, फिर्यादीस शिवीगाळ करुन दमदाटी केली आहे म्हणून. वरील आरोपीताविरुध्द सरकारतर्फे फिर्याद आहे. तपासः- सपोनि- सोनवणे- **७५८८००१८१८** |